# THE BOMBAY (OKHAMANDAL SALAMI TENURE ABOLITION) ACT, 1953

## (Bombay I of 1954)

## मुंबई (ओखामंडल सलामी सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत) अधिनियम, १९५३

### अनुक्रमणिका.

प्रारंभिक.


| कलमें | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... | ११६५ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | ११६५ |
| ३. | सलामी सत्ताप्रकार नाहींसा करणें व जमीनमहसूल देण्याबाबत धारण करणाराची जबाबदारी. | ११६५ |
| ४. | रद्द करणें ... ... ... ... ... ... ... | ११६६ |

# सन १९५४ चा मुंबई अधिनियम, क्रमांक १*

[ मुंबई (ओखामंडळ सलामी सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत) अधिनियम, १९५३ ]

[ ४ जानेवारी १९५४ ]

## मुंबई राज्यांतील अमरेली जिल्हयाच्या ओखामंडळ तालुक्यांत अस्तित्वांत असलेला सलामी सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील अमरेली जिल्हयाच्या ओखामंडळ तालुक्यांत अस्तित्वांत असलेला सलामी सत्ताप्रकार नाहींसा करणें व यांत यापुढें दिलेल्या इतर आनुषंगिक व परिणामभूत गोष्टींसाठीं तरतूद करणें आवश्यक आहे ; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई ओखामंडळ सलामी सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत अधिनियम, १९५३, असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो मुंबई राज्यांतील अमरेली जिल्हयाच्या ओखामंडळ तालुक्यास लागू आहे.

(३) तो राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेपासून अंमलांत येईल.

२. (१) विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास या अधिनियमांत— व्याख्या.

(अ) "जमीन महसूल अधिनियम" या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, असा समजावा ;

(ब) "धारण करणारा" या संज्ञेचा अर्थ, सलामी जमीन धारण करणारा इसम, असा समजावा ;

(क) "सलामी जमीन" या संज्ञेचा अर्थ, सलामी सत्ताप्रकारानें धारण केलेली जमीन, असा समजावा ;

(ड) "सलामी जमिनीबाबत नियम" या संज्ञेचा अर्थ, तारीख ३० जुलै १९४९ च्या निकटपूर्वी पूर्वीच्या बडोदें संस्थानच्या विलीन प्रदेशांत अंमलांत असलेले ओखामंडळ तालुक्यांतील सलामी जमिनीच्या सत्ताप्रकाराचें नियमन करण्याबाबत नियम, असा समजावा ;

(इ) "सलामी सत्ताप्रकार" या संज्ञेचा अर्थ, सलामी जमिनीबाबत नियमांअन्वयें ज्या सत्ताप्रकारानें जमीन धारण करण्यांत आली असेल तो सत्ताप्रकार, असा समजावा ;

(२) जमीन महसूल अधिनियमांत व्याख्या केलेल्या परंतु ह्या अधिनियमांत व्याख्या न केलेल्या शब्दांचा किंवा शब्दप्रयोगांचा जमीन महसूल अधिनियमांत जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ आहे असें समजण्यांत आले पाहिजे.

(३) सलामी जमिनीबाबत नियम व सलामी सत्ताप्रकारास आनुषंगिक असलेल्या गोष्टींसंबंधीं ह्या अधिनियमांत असलेले उल्लेख हे, या अधिनियमाअन्वयें उक्त नियम रद्द करण्यांत आला असला व उक्त सत्ताप्रकार नाहींसा करण्यांत अलेला असला तरीहि, हा अधिनियम अंमलांत येण्याच्या निकटपूर्वी उक्त नियम व आनुषंगिक गोष्टी ज्या स्वरूपांत चालू होत्या त्या स्वरूपांत त्याज्यासंबंधीं केलेले उल्लेख होत, असें समजून त्याप्रमाणें त्यांचा अर्थ लावण्यांत आला पाहिजे.

३. हा अधिनियम अंमलांत येईल त्या तारखेपासून व तारखेस— सलामी सत्ताप्रकार नाहींसा करणें व जमीन महसूल देण्याबाबत धारण करणाराची जबाबदारी.

(१) अमरेली जिल्हयाच्या ओखामंडळ तालुक्यांत ज्या ज्या ठिकाणीं सलामी सत्ताप्रकार चालू असेल त्या त्या ठिकाणीं तो नाहींसा करण्यांत आला आहे असें समजलें पाहिजे आणि उक्त सत्ताप्रकारासंबंधीं सर्व अनुषंगिक गोष्टी ह्या, नष्ट करण्यांत आल्या आहेत, असें समजलें पाहिजे;

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(२) ह्या अधिनियम अंमलांत येण्याच्या निकटपूर्वी ज्या सनदा व अनुदानें याअन्वयें सलामी जमीन धारण करण्यांत आली असेल त्या सर्व सनदा व अनुदानें ही नाहींशीं करण्यांत आली आहेत असें समजलें पाहिजे ;

(३) जमीन महसूल अधिनियम व त्याअन्वयें केलेले नियम यांच्या उपबंधांनुसार सर्व सलामी जमिनी राज्य सरकारास जमीनमहसूल देण्यास पात्र आहेत व असतील ;

(४) धारण करणारा ह्या, त्यानें धारण केलेल्या अशा जमिनीच्या संबंधानें राज्य सरकारास येणें असलेला जमीनमहसूल देण्यांबद्दल प्रथमतः जबाबदार असेल आणि त्यास, जमीनमहसूल अधिनियम किंवा त्याअन्वयें केलेले नियम किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणताहि विधी याअन्वयें खातेदार म्हणून अशा जमिनीच्या संबंधानें सर्व हक्क असतील व तो अशा जमिनीसंबंधाने असलेल्या सर्व जबाबदाऱ्यांस पात्र असेल.

रद्द करणें. ४. सलामी जमिनीबाबत नियम याअन्वयें रद्द करण्यांत आले आहेत :

परंतु, उक्त नियम रद्द केल्यामुळें ह्या अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेपूर्वी अगोदरच पत्करलेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याहि जबाबदारीस किंवा बंधनास बाध येतो असें समजतां कामा नये.